महिन्याचा विचार

## ''प्रार्थने मागील कार्यकारणभाव''

संपूर्ण विश्वात आपल्या सगळ्यात जवळ असणाऱ्या विधात्याला प्राप्त करून घेणे इतके अवघड का असावे? वस्तू आपल्या कितीही जवळ असली आणि आपण तिच्या स्थानाच्या विरूद्ध दिशेला तोंड फिरविले तर ती आपल्याला कधीच दिसणार नाही. हाच मोठा प्रश्न आहे. हीच मोठी समस्या आहे. विधात्याची काहीच चूक नाही, त्याच्या सान्निध्याची काहीच चूक नाही. आपली नजर इतरत्र असते. हीच चुकीची गोष्ट आहे. ज्या दिशेला आपण नजर फिरवतो, त्या दिशेमध्येच गोंधळ आहे.

म्हणून सर्व संतांनी एकच प्रार्थना केलेली आहे – ''हे ईश्वरा! माझ्यावर सतत कृपादृष्टी ठेव. मला तुझे सतत स्मरण करण्याची शक्ती दे. माझ्या मनात सतत तुझाच विचार असू दे. माझे संपूर्ण अस्तित्व तुझ्या दिशेला असू दे. माझ्या नजरेला इतर काहीही दिसायला नको, माझ्या कानावर(तुझ्या नामाव्यतिरिक्त) काहीही पडू नये. माझ्या कानी सतत तुझे नांव, तुझे वर्णन, तुझी झळाळी, तुझी स्तुती येवो. माझ्या नजरेला सदैव तू आणि तुझ्या संदर्भातील सर्व काही पडू दे. ज्यायोगे मी तुझ्या आसपास पोहोचू शकेन, अशाच गोष्टी मला दिसू दे. फक्त तुझा आणि तुझाच विचार करणारे मन मला दे.''

अशाप्रकारे सर्व संज्ञांद्वारे आपण भगवंताकडे आपला रोख वळवायला हवा. ''त्या'' च्या दिशेने आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांची वाटचाल होऊ दे. आपले मन, आपले अस्तित्व इतर कशावरही स्थिर होऊ नये. फक्त परमात्म्याशी अनुसंधान असावे, हाच एकमेव मार्ग आहे, आपले ध्येय आहे, आपले संचित आहे.



हे साध्य करण्यासाठी, लागणारी शक्ती–बुद्धी मिळावी यासाठी आपण सतत प्रार्थना करायला हवी. यातून दुसरी समस्या उद्भवते. सर्व धर्मांनी ग्रंथांनी, संतांनी एकरवाने सांगितले आहे की, परमेश्वर सर्वत्र आहे. त्याच्या अस्तित्वाने सगळा आसमंत व्यापला आहे. त्याला आपली परिस्थिती माहित असते का? असल्यास मग वेगळी प्रार्थना करण्याची गरज काय? आपण प्रार्थना का करायची? परमेश्वर सगळी स्थिती आपोआप त्याच्या परिने दुरूस्त का करत नाही?

लहानग्या बाळाला, काहीही कळत नसते/व्यक्त करता येत नसते. प्रेमापोटी आणि काळजीपोटी आईला आपोआप कळते. ''अरे बाळाचे पोट बिघडले आहे. अस्वस्थ होऊन ते रडते आहे.'' परमात्मा तर आई वडीलांपेक्षाही ''अधिक'' काहीतरी असतो. आपल्यासाठी तो सर्व काही असतो. पृथ्वीवर ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या पालकांपेक्षाही त्याला अधिक माहित असते. अस असताना, आपली परिस्थिती, आपल्या विवंचना हरप्रकारे त्याच्या नजरेस पडण्याची आवश्यकता काय? त्याला काहीच माहित नसते का? त्याला सगळं सांगायला हवे असते का? विधाता आपल्या डोळ्यांचे डोळे असतो, आपल्या कानांचे कान असतो, मनाचे मन आणि हृदयाचे हृदय असतो, असे असताना प्रार्थनेचे प्रयोजन काय? प्रार्थनेचा अर्थ काय असतो? ''प्रार्थना सर्वांवर मात करते''असे आपण जेव्हा मानतो तेव्हा आपल्यापुढे नेमके कोणते विचार असतात?

एखादा कपडा खराब होतो, मळतो आणि आपल्याला तो स्वच्छ करायचा असतो, – पांढराशुभ्र आणि पुन्हा झळकणारा! मग आपण तो गरम पाणी असलेल्या बादलीत टाकतो आणि वरून साबणाची पावडर टाकतो. पाण्याला अथवा साबणाला कपड्याची गरज नसते. इतर अनेक कामे ते स्वतंत्ररित्या करू शकतात. तरीही आपण या तिघांना एकत्र आणतो. का?



कारण कापडाला पाण्याची गरज असते, कापडाला साबणाची गरज असते. म्हणून कापड त्या पाण्याच्या, त्या साबणाच्या सान्निध्यात जाते.

मग ते कापड स्वच्छ, शुभ्र, निर्मळ होते. त्यातील घाण निघून जाते. ते पूर्वीच्या अवस्थेला प्राप्त करते. प्रार्थनेमागील कार्यकारणभाव नेमका हाच असतो. भगवंताला काही माहित नसते, असे नाही. त्याला काही सांगण्याची गरज असते, असेही नाही. त्याला सर्व अवगत असते. जो प्रार्थना करतो, तो सर्वकाही भरून पावतो, प्रार्थनेमधून निर्माण झालेल्या संपर्कातून त्याला मोक्ष मिळतो. त्याच्यावर कृपादृष्टी होते. पृथ्वीतलावरील सर्व धर्मांमध्ये प्रार्थनेने स्वत:चे असे एक गूढ स्थान प्राप्त करून घेतलेले आहे. सर्व धर्म प्रार्थनेवर भर देतात. त्याला माहित नसलेले आपण काही सांगत नसतो, किंवा खर तर त्याला काही सांगण्याचीही गरज नसते. फक्त प्रार्थना केली की आपली उंची वाढते, आपल्याला निर्मळ होता येते. त्याच्या कृपेला पात्र होता येते. म्हणून आपण प्रार्थना करावयाची असते.

त्या परमात्म्याशी सतत संधान राहावे, संवाद असावा म्हणून आपण आपल्या गुरूंची प्रार्थना करायला हवी. त्यातच मानवी जीवनाचे इतिकर्तव्य सामावलेले आहे. पृथ्वीतलावर यात्रेसाठी अवतरलेल्या आत्म्याचे त्यातच सार्थक आणि यश सामावलेले आहे. हा अंतिम प्रवास असावा, परतावे लागू नये म्हणून जीवनाची ही यात्रा त्या गंतव्य स्थानावर पोहोचावी, यासाठी आपण प्रयत्न करावयास हवेत.

मूळ लेख – Rational Behind Prayer<br>(स्वामी चिदानंद सरस्वती)

भावानुवाद – डॉ. नितिन देशपांडे

A sage is a torch bearer of wisdom. He is the beacon light or light house that guides humanity in the dark ocean of samsara. God is the great purifier. A saint also is a great purifier. God incarnates as Saints & Sages when their need is felt most. Divine grace works through the saints. Lives of Saints are the compass needles on your voyage to Moksha(Realization). Follow the teachings of Saints & Sages, the perfected beings, the seers of truth. Attune yourself with the Spirit. God who is an ocean of mercy & Love, is waiting with outstretched arms to receive his children. So let us turn to him now.

**What is Vairagya?**

If the mind is constantly thinking of tea & if it gets pain when you don't get it. It is said that you have got "Aasakti"(Attachment) for tea. This aasakti leads to bondage. The practice of Vairagya(dispassion) demands you to renounce this Aasakti to tea. Mere giving up of taking tea does not constitute the essence of Vairagya.

Study "Vairagya" from Yoga-Vasishtha. You will have a comprehensive understanding of the real nature of Vairagya. A clean description of the actual dispassionate mental state of Sri Rama is given. Palatable dishes refreshing beverages, affectionate parents, brother, dear friends, diamonds, pearls, flowers, Sandal, ornaments, soft beds, garden had no attraction for him. On the contrary their very sight gave him intense pain.

Vairagya includes celibacy in thought, word & deed.

**- Swami Sivananda**



## दिव्य जीवन संघ, पुणे शाखा वृत्तांत

- ✻ तेरावी राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा दि. २४ सप्टेंबर रोजी संपन्न झाली. त्यांत चार महाविद्यालयातील तेरा विद्यार्थ्यांनी भाग घेतला.
- ✻ ऑक्टोबर महिन्याचा सत्संग डॉ. आनंद राव यांच्या घरी दि. २९ ऑक्टोबर रोजी झाला.
- ✻ ''दिव्य जीवन'' या मासिक पत्रिकेचा दिवाळी अंक (सप्टेंबर-ऑक्टोबर) परिवारातील सदस्यांना वितरीत करण्यात आला.

### पुणे शाखेचा पत्ता

श्री. गो. आ. नगरकर
'स्वानंद एस् २०,
सहजीवन सोसायटी,
पर्वती, पुणे ४११००९
मो. ९३७०५७०२०६

श्री.नितीन देशपांडे
'ईशावास्य'
प्लॉट नं. ४९/सायंतारा,
डी.एस.के. विश्व, धायरी,
पुणे ४११०४१
मो.नं. ९८५०९३१४१७
९८५०८२६९९०

बुक पोस्ट

प्रति





# दिव्य जीवन



वर्ष १२/अंक १०
नोव्हेंबर २०१७

If there is an empty life, a life that is not committed, that condition should not be allowed to remain. Therefore the one thing that is desirable is to committed to a sublime goal to be absolutely, entirely, totally committed to a noble objective, to a lofty ideal. That is supposed to be Sadhak's life.

A Sadhak is one, who has chosen the highest! That is the spirit of the Upanishad's - "No matter what it is, if it is anything other than Brahma Jnana(Self realization), I reject it, I don't want it. Let anyone have it. That is the spirit." Lord Krishna says "What can there be higher than the ultimate reality? What can there higher or greater than God?" Thus enlightens our beloved & worshipful Gurudev.